<u>नियमित दिवाणी मुकदमा क्र. १०३/२०१६</u>
(सुरेश पाटील – वादी वि. श्रीपाद पाटील वगैरे –प्रतिवादी)

## :– नि. ५८ खालील आदेश –:

१. अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी नं. ०६ श्री. प्रदीप पुरुषोत्तम दाभोलकर हे दिनांक ०७/१२/२०२० रोजी मयत झाले असून त्यांचे अर्जात नमुद प्रतिवादी नं.६–अ ते ६–क हेच कायदेशीर वारस आहेत. त्यांचे व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत. त्यामुळे दाव्यामध्ये तशी दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती वादीतर्फे करण्यात आली आहे.

२. प्रतिवादी नं. ५ व ७ यांनी अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे . त्यांचे म्हणणे की, अर्जामध्ये नमुद केलेले कारण संयुक्तीक नाही. तरी अर्ज नामंजुर करण्यात यावा व अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास प्रतिवादींना रक्कम रुपये १०००/– इतका खर्च देण्याचा आदेश व्हावा अशी विनंती प्रतिवादींतर्फे करण्यात आली आहे. इतर प्रतिवादींना उचित संधी देवूनही त्यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल न केल्याने सदरचा अर्ज त्यांचे म्हणणे विना चालविण्यात आलेला आहे.

३. अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने सदरचा दावा, हक्कप्रस्थापना व कायम ताकीद आदेशासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी नं.०६ हे मयत झाल्याने त्यांचे वारस म्हणून अर्जात नमुद प्रतिवादी नं ६–अ ते ६–क हे कायदेशीर प्रतिनिधी आहेत. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ अन्वये *''दाव्यातील वादी किंवा प्रतिवादी मृत्यू पावल्यास आणि दावा दाखल करण्याचा अधिकार टिकून राहिल्यास अशा वादी किंवा प्रतिवादीच्या कायदेशीर प्रतिनिधीस दाव्यामध्ये समाविष्ट करुन घेतले जाते.''*

४. प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी नं. ०६ हे दिनांक ०७/१२/२०२० रोजी मयत झाले आहेत. प्रस्तुतचा दावा, हक्कप्रस्थापना व कायम ताकीद आदेशासाठी दाखल केला असल्याने प्रतिवादी नं.०६ चे वारसांना देखील त्या मिळकतीमध्ये

हक्क प्राप्त होतो. त्यामुळे परिणामकारक हुकूमनामा काढण्यासाठी प्रतिवादी नं.०६ चे वारस दाव्यामध्ये सामील करणे आवश्यक आहे. प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब नि. ५६ कडील अर्जावरील आदेशान्वये माफ करण्यात आलेला आहे. तसेच प्रतिवादी नं.०६ विरुध्द 'दावा उपशमित' झालेबाबतचा आदेश नि. ५७ कडील आदेशान्वये रद्द करण्यात आला आहे. सबब सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. नि. ५८ कडील अर्ज मंजुर करण्यात येत आहेत.

२. वादी यांना मयत प्रतिवादी नं.०६ चे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर दाखल करण्यास व अर्जातील मागणीप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

३. अर्जदार यांनी सदर आदेशाच्या तारखेपासून १४ दिवसाच्या आत दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर सामील करावी.

सही/–

दिनांक– ०४/०१/२०२२

(अ. जो. बाचुळकर)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
कुडाळ.